Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १३] शनिवार, फेब्रुवारी २८, २०२६/ फाल्गुन ९, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३६.

महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

सूचना

क्रमांक मं.वि.यो.नामप्रविप्रा-सूचना-कलम-३७-२३५२-२०२६.-

ज्याअर्थी, नागपूर महानगर प्रदेश विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४१६-प्र.क.-१२२(अ)-२०१६-नवि-९, दिनांक ०५ जानेवारी, २०१८ अन्वये भागशः मंजूर झालेली असून, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, उर्वरित भागाची विकास योजना (EP/Excluding Part) शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१६-प्र.क्र.-१२२(ब)-ई.पी.-२०१६-नवि-९, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये मंजूर झालेली आहे; (यापुढे "उक्त विकास योजना' असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेत मौजा वडगांव (गुजर), तह. हिंगणा येथील नविन खसरा क्र. १७६ (मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविलेले जुना ख. क्र. १७४/२, १७६, १७७, १७८, १७९) ह्या जागा अर्बन सेक्टर बाहेर स्थित असून "कृषी, नाला व विद्यमान रस्ता" मध्ये समाविष्ट आहे. (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, नविन खसरा क्र. १७६ (जुना ख. क्र. १७४/२, १७६, १७७, १७८, १७९), ख. क्र. १८२, १८३, १८४, १९६, १७५,१६९, १६७, १९७, १६८ व १६३ या जागेवर मंजूर विकास योजनेत दर्शविण्यात आलेल्या रस्त्या ऐवजी सदर रस्ता अस्तित्वात (विद्यमान) नसल्याने, नियोजनाच्या दृष्टीने १२.० मी. रूंद रस्ता प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना

अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याचे ठरविले आहे. सदर क्षेत्राकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहे व यासाठी ठराव क्र. ०७, २७ जानेवारी, २०२६ अन्वये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा उक्त विकास योजनेचा भाग नकाशा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, स्टेशन रोड, सदर, नागपूर - ४४०००१ या कार्यालयात कामकाजाच्या सर्व दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या निरीक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तसेच सदर अधिसूचना प्राधिकरणाच्या **www.nmrda.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त होतील, त्यावर नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरणाकडून सुनावणी देण्यात येईल. तद्नंतर फेरबदलाचा उक्त प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.

संजय मीणा,
महानगर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नागपूर.

नागपूर :
दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६.

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३७.

BY METROPOLITAN COMMISSIONER, NAGPUR METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

MODIFICATION UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

NOTICE

No. D.P. (NMRDA) Notification-Sec-37-2352-2026.-

Whereas, the Development Plan of Nagpur Metropolitan Region Development Authority has been partially sanctioned by the Govt. *vide* Urban Development Department Notification No. TPS-2416-CR 122(a)-2016-UD-9, Dt. 05th January, 2018 and came into force from 9th February, 2018. Excluded part of Development Plan has been sanctioned *vide* Government Notification No. TPS-2416-CR-122(b)-EP-2016-UD-9, Dt. 21st February, 2019. (hereinafter referred to as " said Development Plan");

And whereas, in the Sanctioned Development Plan, the said land of Mouza- Wadgaon (Gujar), Tah. Hingna, New Khasra No. 176 (Old Khasra No. 174/2, 176, 177, 178, 179) is included in Out of sector and shown as "Agriculture, Nalla & Existing road" (hereinafter referred to as "said Land");

And whereas, as per Section 37*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, in respect of New Khasra No. 176 (Old Khasra Nos. 174/2, 176, 177, 178, 179), Khasra No. 182, 183, 184, 196, 175, 169, 167, 197, 168, and 163, Nagpur Metropolitan Region Development Authority has decided to propose a 12.0 M. wide road from a planning perspective, since the road shown in the Sanctioned Development Plan does not exist at site. The Planning Authority for the said land is Nagpur Metropolitan Region Development Authority. The Authority has passed Resolution No. 07, 27th January, 2026 to make the aforesaid modification;

Therefore, the part of said Development Plan showing the aforesaid modification are kept open at the office of the Nagpur Metropolitan Region Development Authority, Station Road, Sadar, Nagpur-440001 for inspection by public during office hours on all working days. This Notification shall also be available on the this office website *www.nmrda.org*. The suggestions and objections which may be received to Nagpur Metropolitan Region Development Authority in respect of the said modification to the Development Plan

within a period of one month from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* will be heard by the Nagpur Metropolitan Region Development Authority before submitting the said modification proposal, to the State Government for sanction.

SANJAY MEENA,
Metropolitan Commissioner,
Nagpur Metropolitan Region Development Authority,
Nagpur.

Nagpur :
Dated the 26th February, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.